PEER- REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

ISSN 2278-5655

Bi-Monthly

VOL - II | ISSUES - V | [2013]



Chief-Editor:
Ubale Amol Baban

[ **Editorial/Head Office**: 108, Gokuldham Society, Dr.Ambedkar chowk, Near TV Towar,Badlapur, MS

# " महीला सबलीकरण तथ्य आणि भ्रम "

डॉ.सुलभा गावंडे ( खळतकर )
प्राचार्या
कला, वाणिज्य महीला महाविद्यालय,
बल्लहारपुर

21 व्या ातकाच्या पूर्वार्धात सर्वच क्षेत्रात दैहीप्यमान कामगीरी करीत स्त्रिया या समाज परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक बनत आहेत. शिक्षणाच्या संधीमुळे स्त्रिया ज्या ज्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या त्या ठिकाणी त्यांच्यातील वैशिष्टपूर्ण बाबी जाणवतात कामातील प्रामाणिकता, शिस्तबध्दता, नीटनेटकेपणा इ. म्हणुनच महीलांसाठी म्हणावेसे वाटते

The willingness to listen,
The patience to understand,
The strength to support,
The heart to care,
That is the beauty of women.

गेल्या शतकभरात काळात महीलांच्या स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असुन सर्वच क्षेत्रात महीलांनी उत्तुंग झेप घेतली आहे. राजकीय मताधिकारापासून समान हक्काचा मागणीपर्यंत महीलांच्या चळवळीने वाटचाल केली आहे. भारतात महीला चळवळीला उशिरा सुरूवात झाली असली तरी पुढच्या काळात हा प्रवाह गतीमान राहीला हे महत्वाचे आहे. तीन दशकांपुर्वी श्रीमती इंदीरा गांधीची पंतप्रधान पदी झाालेली निवड जशी जगभ ार कौतुकाची विषय ठरली तशीच अलीकडे राष्ट्रपतीपदाचा यशस्वीपणे कार्यकाल पूर्ण करणाऱ्या प्रतिभाताई पाटील विस्मयचकीत

करणाऱ्या ठरल्या. जागतिक किर्तीच्या अमर्त्य सेन या अर्थतज्ञाने दिलेला खालील मंत्रच येथे महत्वाचा वाटतो. " कोणत्याही देशाची प्रगती जाणुन घ्यायची तर ती त्याच्या ग्रामीण विकासाच्या कसोटीवर समजून घेतली पाहिजे" एका बाजुला महीलांच्या कार्यकर्तुत्वाला सर्व क्षेत्रात संधी मिळत असल्याबदद्ल समाधान वाटावे अशी परीस्थिती असली तरी दुसरी कडे मनात सलणाऱ्या काही बाबींचाही उल्लेख करायला हवा आंतरराष्ट्रीय आर्थिक अनुसंधानाने जगभराच्या 130 देशांतील स्त्री विकासाचे सर्वेक्षण केल्यानंतर असे आढळुन आले की भारताचा स्त्री विकासात 113 वा क्रमांक लागला आणि स्त्रीयांना समान हक्क व सन्मानाचे स्थान देणाऱ्यात नार्वे हा प्रथम क्रमांक घेणारा देश ठरला, त्या पाठोपाठ स्वीडन, डेन्मार्क स्कॅंडेनोव्हियन या रा ट्रांचा अंतर्भाव असून त्या देशाची अहवालानुसार भारतातील स्त्रीयांना अर्थव्यवहारातील सहभाग आरोग्य जीवनाची हमी आणि राजकीय अधिकार या कसोटयांवर सर्वेक्षण करणाऱ्या या अनुसंधानाने भारतातील स्त्रीयांना राजकीय अधिकाराबाबत काही गुण दिले आहेत. मात्र हिच बाब वगळली तर अन्य सर्व क्षेत्रात भारतीय स्त्री फारच मागे राहील, याची काळजी घ्यावी हे सर्वेक्षणांने दाखवून दिले आहे. स्त्रीयांचे आरोग्य व जीवीतरक्षण याबाबत भारताचा 128 वा क्रमांक असून बालमृत्युचे प्रमाण इतके वाढले की भरताला थेट अपराध्याच्या पातळीवर नेवुन बसवले आहे. दर 1 लक्ष जन्मा मागे मुलींच्याच मृत्यचे प्रमाण संख्या 450 एवढी आहे ( आरोग्य खात्याच्या बुलेटीन वरून) तसेच ओरीसा/बिहार या सारखी राज्ये दरवर्षी स्त्रीभुण हत्येची संख्या 12 ते 13 लाख इतपर्यंत गाठतात हे राष्ट्रीय अहवालानुसार सिध्द झाले आहे महाराष्ट्रातही स्त्रीभुण हत्येचे प्रकार राजरोसपणे सुरू असल्यामुळे दर हजारी स्त्रीयांचे प्रमाण कमी होत आहे. राजस्थानात दरवर्षी लाखोंनी बालविवाह होत असल्याचे चित्र दिसते जरी आपल्या भारतात बालविवाहाला बंदी घालणारे कायदे असुनही हि स्थिती आहे. तुलनेने शिक्षणात मुलींचे यशस्वी होण्याचे प्रमाण

जास्त असूनही आजही त्यांच्यावरील अन्याय अत्याचार व हुंडाबळीचे प्रमाण कमी झाालेले नाही. दिल्लीतील सामुहीक बलात्कार, मुंबईतील शक्तीमील परीसरातील घटना मनविभिन्न करतात.

महिलां विषयक गुन्हयांचे वाढते प्रमाण विचारात घेउनच राज्यभ|रातील पोलीस आयुक्तालय महीला सहायय कक्ष स्वतंत्रपणे स्थापना करतात. हि बाब कौतुकास्पद अभिमानास्पद बाब नक्कीच नाही. सांस्कृतिक व समाजसेवेच्या क्षेत्रात महिलांनी उच्च स्थान मिळविले असले तरी धर्मिक क्षेत्रात सर्वोच्च स्थानापासुन महिला दूरच आहे. आजवर किती महिला शंकराचार्य दलाईलामा किंवा पोप बनल्यात ऐकीवात नाही. म्हणुन म्हणते की महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोनात अद्याप व्हावा तसा बदल झालेला नाही. असाच यातून अर्थ निघतो की महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोनात पाहिजे तसा बदल झालेला नाही. आपण महिलनां फारसे चांगले वागवत नाही, त्यांच्या आरोग्याची पाहिजे तशी पूरशी काळजी घेत नाही. त्यांना पहीजे तो योग्य सन्मानही त्यांचा राखला जात नाही. यावरून असेच सिध्द होते की, वरील चित्र कायद्याने बदलता येईल असे वाटत नाही तर त्यासाठी खऱ्याखुऱ्या मानसिक परीवर्तनाची गरज आहे. आर्थिक सुबत्ता आली सांस्कृतिक संपन्नता येते हा ही एक गैरसमज आहे. कारण स्त्रीभ्रुण हत्येचे कारण ओरीसा/बिहार मध्ये जास्त असण्यास दारीद्रयता आहे समजले तर पंजाब व हरीयाणा सारखी संपन्न राज्ये ही स्त्रीभ्रुण हत्येचे अपराध करतांना आढळुन येतात. याचाच अर्थ स्त्री विषयक मानसिकता हे ही कारण आहे. संपन्नता व संस्कृती याचा संबंधी संशय करून टाकणे हे दुदैवी सत्य आहे. या वास्तवते पासून दूर होता येत नाही. सध्या व्यवसाय राजकीय अधिकारपदे समाजव्यवस्थेतील व स्त्रीयांना मिळणाऱ्या संधी जरी वाढल्या असतील तरी ''हि संधी आम्ही पुरूष वर्गानी दिली'' या धारणे पासून पुरूष वंचित नाही. त्यामुळे स्त्रीयां फक्त संधीच पूरेशी नसून पुरूषांच्या समजुदार मानसिकतेची गरज आहे.

एकविसाव्ये शतक उजाडल्यानंतर आई, बहीण आणि पत्नी या सारख्या नात्यात स्त्रीचे अस्तीत्व मान्य करणे हा स्त्री संस्कार आहे. तीचे मनुस्यत्व मान्य करणे हा ही एक संस्कार आहे. स्त्रीयांच्या समानतेचा विचार करणाऱ्या सर्व पुरूष वर्गाने आज असा विचार करणे व मानसिक गुलामगीरीतून बाहेर पडण्यास विवेकपूर्ण दृष्टीकोन ठेवणे हे स्त्रीयांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने हिताचे राहील. एकीकडे महीलांना प्रति ठा प्राप्त होण्यासाठी सरकार महीला सबलीकरणाच्या योजना राबविते तर दुसरीकडे महीला धैर्याने पुढे जात असतांनाच अत्याचाराला बळी पडतात. तेंव्हा या रणरागिंणींना आता कराटे वर्गाच्या माध्यमातुन सक्षम होण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्यांनी अशा उपक्रमांना महीलांना सहकार्य करणे हिच काळाची गरज आहे. तसेच शासनानेही स्त्रीयांसाठी विविध सुविधा पुरवाव्यात, काही खास कायदे करून व्यावसायिक सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे स्त्रियांमध्ये असलेल्या विविध कौशल्ये कलाक्षमता विकसीत करण्यात प्राधान्य द्यावे स्त्रियांचा सन्मान करावा आदर राखावा. स्त्रीयांच्या समतेचा विचार करणाऱ्या सर्व पुरूष वर्गाने आज विचार करणे व मानसिक गुलामगीरीतून बाहेर पडण्याचा विवेकपूर्व दृष्टीकोण ठेवणे स्त्रीयांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने हिताचे आहे.

संदर्भ :


1. आधुनिक स्त्रीयांचे युग .. ओशो

2. स्त्री पुरू ा तुलना .. ताराबाई शिंदे

3. आपली संस्कृती .. इरावती कर्वे

4. शिक्षण संक्रमण .. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पूणे.
5. राष्ट्रीय अहवाल
6. महीलांचे सबलीकरण .. डॉ.सौ. नंदीनी तडकलकर(चौधरी) आणि शेतकरी महीला आघाडीचे योगदान